# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर

नामप्रविप्रा, स्टेशन रोड, सदर, नागपूर – ४४०००१.
फोन नं. २५३३२०२, पी.बी.एक्स.नं. २५३१४३१, २५३१४३२, फॅक्स नं. ०७१२ २५३१४३१

क्रमांक : साप्रवि/आ.वि./नामप्रविप्रा/कार्य.समि.सभा/२४३ दिनांक : ०८/०५/२०१९

विषय :– **नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
कार्यकारी समितीच्या शनिवार, दिनांक ०४/०५/२०१९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता मिळणेबाबत.

महोदय,

शनिवार, दिनांक ०४ मे, २०१९ रोजी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची बैठक मा. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त मान्यतेसाठी सविनय सादर.

सहपत्र : प्रारूप इतिवृत्त

अपर आयुक्त
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

मा. महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

08·05·19

मा. अपर मुख्य सचिव (गृह)

# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या शनिवार, दिनांक ०४ मे, २०१९ रोजी संपन्न झालेल्या कार्यकारी समितीच्या ६ व्या बैठकीचे इतिवृत्त

दिनांक ०४ मे, २०१९ रोजी मा. श्री संजय कुमार, अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) **मा. श्री संजयकुमार, भाप्रसे,**
अपर मुख्य सचिव, गृहविभाग, महाराष्ट्र शासन तथा अध्यक्ष, कार्यकारी समीती

२) **मा. श्री संजयकुमार, भाप्रसे,**
अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन तथा सदस्य, कार्यकारी समीती

३) **मा. प्रधान सचिव**, नगर विकास विभाग, यांचे प्रतिनिधी श्री. श्रीराम यादव, उप सचिव,. मंत्रालय, मुंबई तथा सदस्य, कार्यकारी समीती

४) **मा. अपर मुख्य सचिव,**
वित्त विभाग, महाराष्ट्र शासन तथा सदस्य, कार्यकारी समिती यांचे प्रतिनिधी कक्ष अधिकारी

५) **मा. श्रीमती शीतल तेली–उगले, भाप्रसे,**
महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तथा सदस्य, कार्यकारी समिती

६) **श्री हेमंतकुमार पवार**, अपर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तथा सदस्य सचिव, कार्यकारी समिती

७) **श्री हेमंत ठाकरे,** मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तथा सदस्य, कार्यकारी समिती

सदर बैठकीत खालील विषयावर चर्चा झाली व निर्णय घेण्यात येवून ठराव पारीत केले.

**ठराव क्र. १/०६/०४.०५.२०१९**

**विषय :–** **बुधवार, दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी संपन्न झालेल्या नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या पाचव्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे व अनुपालन अहवाल अनुमोदनाकरीता ठेवण्याबाबत.**

**ठराव :–** **महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६ नियम क्र. ४ अन्वये महानगर प्राधिकरणाची रचना करण्यात आली आहे. सदर अधिनियमातील नियम क्र. ७ प्रमाणे महानगर प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त कायम करण्यात आले व अनुपालन अहवाल मंजूर करण्यात आला.**